समयमर्यादीत महत्वाचे पत्र

जा.क्र. का.सां.७/स्व.ह.केंद्र/७४ /१७
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे-४११ ००१ दिनांक - ६/०३/२०१७

प्रति,

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)**

विषय - राज्यात महसुल मंडळ स्तरावर स्वयंचलीत हवामान केंद्राच्या उभारणीकरिता जागा निश्चित करणेबाबत.

संदर्भ - १) कृषि आयुक्तालयाचे पत्र. क्र सां-७/स्वंहके/ दि. १७/११/२०१६
२) शासन पत्र क्र राकृवि०६१६/प्र.क्र ७४/राकृवियोकक्ष दि.०६/०३/२०१७

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये राज्यात महसुल मंडळ स्तरावर स्वयंचलीत हवामान केंद्राची उभारणी करणेसाठी महसुल मंडळ स्तरावर जागेची निवड करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दि. ३० ऑगस्ट २०१२ च्या शासन निर्णयान्वये जिल्हास्तरीय समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने प्रकल्पासाठी जागा निवडीच्या दिलेल्या निकषानुसार जिल्हास्तरीय समन्वय समितीच्या मान्यतेने निवड केलेल्या मंडळनिहाय जागेचा तपशील संदर्भ क्र १ नुसार आपण कृषि आयुक्तालयास कळविला आहे.

राज्यात महसुल मंडळ स्तरावर स्वयंचलीत हवामान केंद्राची उभारणी करणेबाबत शासनाने मे. स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रा. लि. मुंबई यांचे बरोबर दि. १५/०२/२०१७ रोजी करारनामा केलेला आहे. सदर करारनाम्याच्या अनुषंगाने प्रकल्पाचे कामासाठी निवड केलेल्या जागेचे सर्वेक्षण मे स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रा.लि. मुंबई यांनी सुरु केले आहे. स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रा.लि. मुंबई कडुन त्यांचे प्रतिनिधीचा संपर्क तपशील त्यांचेस्तरावरुन स्वंतत्ररीत्या कळविण्यात येत आहे.

संदर्भीय शासनपत्रानुसार सदर प्रकल्पाकरिता प्रथम टप्यात कृषि विभागाच्या मालकीच्या असणाऱ्या ज्या ठिकाणी स्वयंचलित हवामान केंद्र उभारणी करणे प्रस्तावित केलेले आहे त्या जागेचा ताबा स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रा.लि. मुंबई यांना प्रकल्प उभारणी करणेकामी तात्काळ देण्याबाबत तसेच जिल्ह्यातील उर्वरीत महसुल मंडळामध्ये शासकीय जागा उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकाऱ्यांमार्फत संबधीत जिल्हाधिकाऱ्यांकडे तात्काळ सादर करण्याबाबत संदर्भीय पत्र क्र २ नुसार शासनाचे निर्देश आहेत. त्यास अनुसरुन कार्यवाही व्हावी ही विनंती.

सोबत - सहपत्र

6/3/2017
**मुख्य सांख्यिक**
**कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य**

प्रती – १ अवर सचिव राकृवियो कक्ष मंत्रालय, मुंबई -३२
२ विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)